# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक २३/०२/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक २३/०२/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, पाणी पुरवठा, आरोग्य, लेखा, शिक्षण, भांडार, अग्निशमन व मिळकत विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

विषय क्र.१ :- मलकापूर न.प. च्या बांधकाम विभागकरिता नमूद केलेल्या कामांना नगर परिषद निधी अंतर्गत मंजुरात मिळणे बाबत.

विषय क्र.२ :- आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२३ अंतर्गत कामांची अंदाजपत्रके सादर करणेबाबत

विषय क्र.३ :- सन २०२२-२३ अंतर्गत मा. मंत्री/मान्यवर/लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त प्रकरणे किंवा प्रस्ताव निकाली काढण्यासाठी संबंधित यंत्रणेस पाठविण्याबाबत.

विषय क्र.४ :- मलकापूर नगरपरिषद अंतर्गत अल्पसंख्यांक विकास निधी मधून विकास कामांना मंजुरी मिळणे बाबत

विषय क्र.५ :- प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत BLC या घटकासाठीचे Curatilment करून सुधारित DPR मंजूर करण्यासाठी प्रस्तावित करण्याबाबत

विषय क्र.६ :- मलकापूर शहरातील मधुमालती नगर मध्ये शासकीय मोकळ्या जमिनीवर अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण भिंत बांधकाम करणे

विषय क्र.७ :- मलकापूर नगर पालिकेच्या बांधकाम विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक दरपत्रक मागविण्या बाबत.

विषय क्र.८ :- मलकापूर नगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी मक्तेदारांची नेमणूक करणे बाबत.

विषय क्र.९ :- मलकापूर न.प. चे जे.सी.क्र २१/२०२० न.प. मलकापूर वि. मे. खरे ॲण्ड तारकुडे इन्फ्रा प्रा.लि. हे प्रकरण सक्षम न्यायालयाकडे वर्ग करण्या करिता वि. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब बुलढाणा यांच्या न्यायालयात पीटीशन दाखल करण्यास येणाऱ्या कोर्ट खर्चास, वकील फी व प्रवास भत्ता मिळणेबाबत.

विषय क्र.१० :- मलकापूर नगर पालिकेच्या आरोग्य विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक निविदा करणे बाबत.

विषय क्र.११ :- मलकापूर नगर पालिकेच्या आरोग्य विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांसाठी वार्षिक निविदा करणे बाबत.

विषय क्र.१२ :- सुनील जगन सारसर सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्ती व रिक्त जागेवर नवीन नियुक्ती करण्या बाबत.

विषय क्र.१३ :- स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत करावयाच्या कामांना मंजुरात देण्याबाबत.

विषय क्र.१४ :- स्वच्छ सर्वेक्षण २०२३ व माझी वसुंधरा ३.० अंतर्गत I.E.C ची नमूद कामे करण्या बाबत.

विषय क्र.१५ :- मलकापूर नगर पालिकेच्या भांडार विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक निविदा करणे बाबत.

विषय क्र.१६ :- मलकापूर नगर पालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक निविदा करणे बाबत.

विषय क्र.१७ :- मलकापूर नगर पालिकेच्या संगणक विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक दरपत्रक मागविण्या बाबत.

विषय क्र.१८ :- मिर्झा मुशीर अहेमद बेग मिर्झा जमीर बेग (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती देणेबाबत.

विषय क्र.१९ :- प्र उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर श्री सुनील एस पगारे यांच्या वैद्यकीय खर्च प्रतीपुर्तीचे बिला बाबत.

विषय क्र.२० :- सन २०२३-२४ करिता दैनिक बाजार, आठवडी बाजार बैठक वसुली व जाहिरात कर वसुली कंत्राट पद्धतीने देणेबाबत

विषय क्र.२१ :- सन २०२१-२२ मध्ये १५ वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रीयेचे कामास २०२२-२३ करिता दि. ०१/१२/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यंत १५ वित्त आयोग निधी अंतर्गत/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प. निधीतून कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून दिलेल्या मुदत वाढीस मान्यता देणे बाबत.

विषय क्र.२२ :- सन २०२१-२२ मध्ये १४ वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकीचे कामास २०२२-२३ करिता दि. ०१/१२/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यंत १५ वित्त आयोग निधी अंतर्गत/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प. निधीतून सन २०२१-२२ चे कंत्राटदारास कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून दिलेल्या मुदत वाढीस मान्यता देणे बाबत.

---

**विषय क्र.१ :- मलकापूर न.प. च्या बांधकाम विभागकरिता नमूद केलेल्या कामांना नगर परिषद निधी अंतर्गत मंजुरात मिळणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद मलकापूर यांनी सदर केलेल्या अहवालानुसार मलकापूर शहर अंतर्गत विविध प्रभागात विकास कामे करणे जरुरीचे असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार करावयाची कामे पुढील प्रमाणे

१)मलकापूर शहरात विविध ठिकाणी CSR दराने नालीवर ढापे टाकणे बाबत.

२)प्रभाग क्र ३ मध्ये गीरी यांचे घरापासून ते ठोंबरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे बाबत.

वरील नमूद कामे नागरिकांच्या सोयींच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे असल्याचे नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी अहवाला द्वारे नमूद केलेले आहे. त्यानुसार मुख्याधीकारी न.प. मलकापूर यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

उपरोक्त कामे नगर अभियंत यांनी सादर केलेल्या अहवाला नुसार करणे आवश्यक असून सदर कामे करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.३ :- सन २०२२-२३ अंतर्गत मा. मंत्री/मान्यवर/लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त प्रकरणे किंवा प्रस्ताव निकाली काढण्यासाठी संबंधित यंत्रणेस पाठविण्याबाबत.**

वरील विषयाची नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

उपरोक्त विषयास अनुसरून मा. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती बुलढाणा यांचे पत्र क्र. ४/२०२३ दि. ०४/०१/२०२३ नुसार सन २०२२-२३ अंतर्गत मा. मंत्री/मान्यवर/लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त प्रकरणे किंवा प्रस्ताव निकाली काढणे संबंधी शासन निर्णयानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत तसेच केलेल्या कार्यवाही बाबत संबंधित मान्यवरांना परस्पर कळवून प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. नगरपरिषद क्षेत्रातील विकास कामे करण्याबाबत माननीय एकनाथराव खडसे विधानपरिषद सदस्य यांनी त्यांचे पत्रानुसार सुचवलेली नमूद केलेली कामे पुढीलप्रमाणे

१) मलकापूर न.प. अंतर्गत ४० बिघा प्रभागात श्री बाबुराव पाटील यांचे घर ते श्री विशाल दवे यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे

२) मलकापूर न.प. अंतर्गत ४० बिघा मधील (माता महाकाली प्रभाग) श्री गुरुदासमल नैनानी यांचे कॉम्प्लेक्स ते श्री कैलास वर्मा यांचे घरापर्यंत कॉंक्रीट गटार बांधकाम करणे

उपरोक्त कामे जिल्हा वार्षिक नागरी दलितेत्तर योजना जिल्हा वार्षिक नगरोत्थान योजना, जिल्हा वार्षिक विशेष रस्ते अनुदान योजना, अथवा इतर कोणत्याही उपलब्ध निधीतून करण्यास तसेच उपरोक्त कामांबाबत संबंधित यंत्रणेकडे प्रस्ताव सादर करण्याकरिता ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.४ :- मलकापूर नगरपरिषद अंतर्गत अल्पसंख्यांक विकास निधी मधून विकास कामांना मंजुरी मिळणे बाबत**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालामध्ये मा. जिल्हा नियोजन अधिकारी बुलढाणा यांचे पत्र क्र कावी/अका/ अल्पसंख्यांक कअ/१२/२०२३ दिनांक ०९/०१/२०२३ नुसार मा. एकनाथराव खडसे महाराष्ट्र विधान परिषद सदस्य यांचे प्राप्तपत्रानुसार मलकापूर नगरपरिषद अंतर्गत अल्पसंख्यांक विकास निधी मधून विकास कामांना मंजुरी मिळून निधी उपलब्ध करण्याबाबत कळविले असून शासन निर्णय नियमानुसार आवश्यक प्रस्ताव तत्काळ कार्यालयास सादर करणेबाबत कळविले आहे. त्यामधील नमूद कामे खालील प्रमाणे

१) मलकापूर नगरपरिषद अंतर्गत अश्फाक लोकल यांचे घर ते अक्सा मज्जिद पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व दोन्ही बाजूने गटार बांधकाम करणे

२) मलकापूर नगरपरिषद अंतर्गत अक्सा कॉम्प्लेक्स पासून ते ईदगाह रोड पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे

३) मलकापूर नगरपरिषद अंतर्गत इमरान मेंबर यांचे घर ते अन्वर किराणापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व एका बाजूने गटार बांधकाम करणे

उपरोक्त कामे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने गरजेचे असल्यामुळे सदर कामे करण्या करिता आवश्यक कार्यवाहीस व येणारा खर्च अल्पसंख्यांक निधी मधून करण्यात ही सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र.५ :- प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत BLC या घटकासाठीचे Curatilment करून सुधारित DPR मंजूर करण्यासाठी प्रस्तावित करण्याबाबत**

वरील विषयास अनुसरून मलकापूर न.प. कडे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २०० लाभार्थ्यांकरिता घरकुल बांधण्याचा सविस्तर प्रकल्प अहवालास शासनाच्या केंद्रीय मंजुरी आणि देखरेख समितीच्या दिनांक २५/०७/२०१९ रोजी ४५ व्या बैठकीत मंजुरी देण्यात आलेली असून सदरील मंजुर DPR मधील ५७ लाभार्थ्यांना अंतिम नोटीस देऊन बांधकाम परवानगीसाठी अर्ज सादर करण्याबाबत कळविले आहे. परंतु सदर लाभार्थ्यांचे जागेचे वाद, हिस्सा वरील जागा कमी असल्यामुळे, ग्रीन झोन, जागा विकल्या कारणाने, लाभार्थी व सहलाभार्थी मयत झाल्यामुळे, आर्थिक अडचणी इत्यादी कारणाने लाभ घेण्यास नकार दिलेला असून, उर्वरित १४३ लाभार्थ्यांनी लाभ घेण्यासाठी अर्ज सादर केले असून त्यांना बांधकामास परवानगी देण्यात आली आहे.

ठरविण्यात येते की, DPR मधील २०० लाभार्थ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवालास सुधारित Curatilment करणे आवश्यक असून त्याकरिता मा. मुख्यअभियंता-२, राज्यस्तरीय नोडल अधिकारी, प्रधानमंत्री आवास योजना, महाराष्ट्र गृहनिर्माण विभाग, मुंबई. यांच्याकडे सदरचा सुधारित प्रकल्प अहवाल सादर करण्यास व सुधारित DPR ला ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- मलकापूर शहरातील मधुमालती नगर मध्ये शासकीय मोकळ्या जमिनीवर अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण भिंत बांधकाम करणे**

वरील विषयास अनुसरून सहाय्यक अभियंता श्रेणी एक सार्वजनिक बांधकाम उपविभाग मलकापूर यांचे पत्र क्र. १५३/तां/२०२३ दि. ३०/०१/२०२३ चे पत्रानुसार मा. खासदार रक्षा निखिल खडसे रावेर मतदार संघ यांचे निधीतून खालील काम करण्या बाबत नमूद केले आहे

१) मलकापूर शहर जिल्हा बुलढाणा येथील शासकीय मोठ्या जमिनीवर अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी मधुमालती नगरमध्ये संरक्षण भिंत बांधकाम करणे

ठरविण्यात येते की वरील नमूद काम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च हा मा. खासदार रक्षा निखिल खडसे रावेर मतदार संघ यांच्या निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.७ :- मलकापूर नगर पालिकेच्या बांधकाम विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक दरपत्रक मागविण्या बाबत.**

**१) सन २०२३-२४ करिता न.प. मालमत्तांची दुरुस्ती, रंगरंगोटी व इतर आवश्यक कामांकरिता दरपत्रक मागविण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंत बांधकाम विभाग यांनी सदर केलेल्या अहवालामध्ये न.प. हद्दीतील नगर परिषदेच्या मालकीच्या मालमत्ता जसे शाळा, अंगणवाडी, न.प. इमारत, पा.पु. आवारातील इमारत व इतर आवश्यक त्य न.प. मालमत्तांची दुरुस्ती, रंगरंगोटी व इतर आवश्यक ती कामे करून घेणे जरुरीचे असल्याचे नमूद केलेले आहे. त्यनुसार सदरचे काम

कालमर्यादेत पूर्ण होण्याकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्यास व येणाऱ्या खर्चास हि सभा मान्यता देत आहे.

**२)न.प. हद्दीतील महापुरुषांच्या जयंतीकरिता पुतळ्यांची व परिसराची रंगरंगोटी करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंत बांधकाम विभाग यांनी सदर केलेल्या अहवालामध्ये न.प. हद्दीतील महापुरुषांच्या पुतळ्यास व त्या सभोवतालच्या परिसराची दुरुस्ती, रंगरंगोटी व इतर आवश्यक ती कामे न.प. मार्फत करून घेण्यात येत असल्याचे नमूद केलेले आहे. या मध्ये शहरातील पुतळे (१)डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा(रेल्वे स्टेशन). (२) डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा(भीम नगर). (३)छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (शिवाजी नगर) (४) छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (बाजीप्रभू नगर) (५)डॉ सुभाषचंद्र बोस पुतळा (तहसील चौक) (६)संत गाडगेबाबा पुतळा (बुलढाणा रोड) (७)शहीद अब्दुल हमीद चौकातील स्तंभ (८)शहीद संजयसिंह राजपूत यांचे शहीद स्मारक (बुलढाणा रोड) (९) डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा(रेल्वे स्टेशन). यांचे रंगरंगोटीची कामे करण्यात येतात. त्यनुसार सदरचे काम कालमर्यादेत पूर्ण होण्याकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्यास व येणाऱ्या खर्चास हि सभा मान्यता देत आहे.

**३)सन २०२३-२४ करिता सणासुदी, उत्सव, महापुरुषांच्या जयंती व इतर उत्सवाकरिता न.प. मार्फत कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांकरिता वार्षिक दरसूची मागविण्या बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंत बांधकाम विभाग यांनी सदर केलेल्या अहवालामध्ये शहरात दरवर्षी गणेशोत्सव, दुर्गोत्सव, महापुरुष जयंती निमित्त व इतर उत्सव साजरे करण्यात येतात व त्याकरिता न.प. मार्फत उपाययोजना केल्या जात असल्याचे नमूद केलेले आहे. या मध्ये शहरातील उत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत पोलीस निरीक्षक मलकापूर यांचे कडून पत्र व सूचना प्राप्त होतात. त्यनुसार सदरचे काम कालमर्यादेत पूर्ण होण्याकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्यास व येणाऱ्या खर्चास हि सभा मान्यता देत आहे.

**४)न.प. हद्दीतील विविध प्रभागामध्ये विविध ठिकाणी कठीण/मउ मुरूम, ८० ते ४० मीमी आकाराची खडी, ६ मीमी आकाराची क्रश खडी यांचा पुरवठा व पसरविण्याच्या कामाकरिता वार्षिक दरसूची मागविण्या बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंत बांधकाम विभाग यांनी सदर केलेल्या अहवालामध्ये शहरात दरवर्षी वेळोवेळी नळ कनेक्शन करिता रस्त्याचे खोदकाम किंवा सततच्या पावसामुळे किवा इतर कारणांमुळे रस्त्यावर खड्डे पडतात व त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असल्याचे नमूद केलेले आहे. रहदारी सुरळीत होण्याच्या दृष्टीने अथवा धार्मिक उत्सवाच्या अनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवावी लागतात. त्यनुसार सदरचे काम कालमर्यादेत पूर्ण होण्याकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्यास व येणाऱ्या खर्चास हि सभा मान्यता देत आहे.

**५)न.प. हद्दीतील क्षेत्रात विविध ठिकाणी रस्त्यातील खड्डे बुजविण्याच्या कामाकरिता वार्षिक दरसूची मागविण्या बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंत बांधकाम विभाग यांनी सदर केलेल्या अहवालामध्ये शहरात दरवर्षी वेळोवेळी नळ कनेक्शन करिता रस्त्याचे खोदकाम किंवा सततच्या पावसामुळे किवा इतर कारणांमुळे रस्त्यावर खड्डे पडतात व त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असल्याचे नमूद केलेले आहे. रहदारी सुरळीत होण्याच्या दृष्टीने अथवा धार्मिक उत्सवाच्या अनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवावी लागतात. त्यनुसार सदरचे काम कालमर्यादेत पूर्ण होण्याकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्यास व येणाऱ्या खर्चास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.८ :- मलकापूर नगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी मक्तेदारांची नेमणूक करणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून पा.पु. अभियंता न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवाला मध्ये मलकापूर शहराला नियमित शुद्ध पाणी पुरवठा करण्याकरिता पा पु . विभाग जलशुद्धीकरण केंद्र व संबंधित यंत्रणा सुस्थितीत व सुरळीत ठेवण्याकरिता सन २०२३-२०२४ वर्षा कालावधीसाठी प्रारूप उपाय योजना / कामे करणे गरजेचे असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार करावयाची कामे खालील प्रमाणे.

**A)** मलकापूर शहरास शुद्ध पाणी पुरवठ्या करिता लागणारे रॉ वॉटर हे मौजे धुपेश्वर येथील पूर्णा नदीतील हतनूर धरण मधील बँक वाटर मधून घेण्यात येते. हतनूर धरणात निरी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षण नुसार ५५% गाळ असून पावसाळयात पाण्याची गाळाचे प्रमाण (टरबिडीटी) १५००० ते ३०००० पी.पी.एम. एवढी असून पाणी शुद्धीकरण करण्यासाठी खालील प्रमाणे विविध रसायनांचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो जर सदर रसायनांचा वापर न केल्यास पाणी शुद्धी करणे शक्य होत नाही.

**१)ब्लिचिंग पावडर:-** पा.पु. विभागाचे जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरु असते या करिता प्रती दिन अंदाजे तीन बॅग (२५ किलो) ब्लिचिंग पावडरची आवश्यकता असते. ब्लिचिंग पावडरच्या बॅग मध्ये प्रती बॅग मध्ये ३३ ते ३४ % क्लोरीन वायू उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रती वर्ष अंदाजे १०९५ इतक्या ब्लिचिंग बॅग लागतील

**२)तुरटी:-** पूर्णा नदीच्या पाण्यामध्ये मोठ्याप्रमाणात गाळाचे प्रमाण असल्यामुळे पाणीतील गाळाचे प्रमाण कमी करण्याकरिता मोठ्याप्रमाणात तुरटीचा वापर करावा लागतो. पाण्यातील गाळाचे प्रमाण कमी करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरु असते.धुपेश्वर येथून पंपिंगद्वारे येणारे पाणी हे दोन फौंटनद्वारे येत असल्यामुळे मागील वर्षाचा सरासरी दैनंदिन अंदाजे प्रती वर्ष अंदाजे २०० टन तुरटी लागत असून सदर तुरटी मध्ये ५० ते १६ % फारिक ALUM उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**३)PAC पावडर (POLY ALUMINIUM CHORIDE):-** पूर्णा नदीच्या पाण्यामध्ये मोठ्याप्रमाणात गाळाचे प्रमाण असल्यामुळे पाणीतील गाळाचे प्रमाण कमी करण्याकरिता मोठ्याप्रमाणात तुरटी सोबतच मोठ्याप्रमाणात PAC पावडरचा वापर करावा लागतो. पाण्यातील गाळाचे प्रमाण कमी करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण

प्रक्रिया सुरु असते.धुपेश्वर येथून पंपिंगद्वारे येणारे पाणी हे दोन फौंटनद्वारे येत असल्यामुळे मागील वर्षाचा सरासरी दैनंदिन अंदाजे प्रती वर्ष अंदाजे १० टन PAC पावडर लागत असून सदर PAC मध्ये १५ ते १६% फेरीक ALUM उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**४)POLY ELECTO FLOCCULANT जेली:**- जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरु असल्यामुळे तसेच मागील वर्षाचा सरासरी दैनंदिन अंदाजे प्रती वर्ष अंदाजे २००० लिटर / किलो POLY ELECTO FLOCCULANT जेली खरेदी करणे आवश्यक आहे.

**५)क्लोरीन टनर:**- नगर पालिका मलकापूर नवीन जल्शुधीकरण केंद्र येथे क्लोरिनेशन प्लॉट असून त्यासाठी क्लोरीनटनर अंदाजे १५ सिलेंडर लागू शकतात.

**६)मनुष्यबळ पुरवठा करणे:**- पा. पु. विभाग जलशुद्धीकरण केंद्र चालविणे, पंपिंग स्टेशन कुशल / अकुशल कामगार कंत्राटी पद्धतीने लावाणेबाबत.

नगर परिषद मलकापूर पा पु विभाग अस्तित्वातील कर्मचारी यांच्या ७०% कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असून जलशुद्धीकरण नगर पालिका मलकापूर कडे ४.८ दशलक्ष क्षमता ४ दशलक्ष क्षमता ३ जलशुद्धीकरण केंद्र असून सदर ठिकाणी पाणी शुद्धीकरण करण्यासाठी ब्लिचिंग पावडर, तुरटी , जेली, PAC चा वापर करणे तसेच पंप चालू बंद करणे, फिल्टर वॉश करणे या कामासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. तसेच मौजे धुपेश्वर पंपिंग स्टेशन येथे सुद्धा कर्मचारी आवश्यक आहे. तसेच इतर कामे लिकेज खोदकाम, हातपंप खोलणे/बसविणे, धुपेश्वर येथील पंप खोलणे/बसविणे, पाणी टंचाई मध्ये काणे करण्यासाठी कर्मचारी आवश्यक असून नवीन कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत न होण्याकरिता उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे.

**B) पा. पु  विभाग विद्युत देखभाल दुरुस्ती करणे व साहित्य पुरविणे:**- पा.पु. विभागातील पंपिंग स्टेशन धुपेश्वर, नळगंगा जॅकवेल व जलशुद्धीकरण केंद्र येथे विविध क्षमतेचे CENTRIFUGAL पंप, व्हार्टीकल टर्बाईन पंप, मोटार, मडपंप, रोहित्र आहेत. सदर ठिकाणी मोटार जळणे, पंप जळणे, पंप नादुरुस्त होणे, विविध प्रकारच्या तांत्रिक समस्या निर्माण होत असतात. तसेच धुपेश्वर, जलशुद्धीकरण केंद्र व आवारातील लाईटिंग साहित्यासह दुरुस्ती करणे इत्यादी कामाकरिता वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे.

**C) पा.पु. विभाग मलकापूर ते धुपेश्वर पाईप लाईन, शहरातील वितरण व्यवस्था तसेच इतर किरकोळ कामे शासकीय दरसूची नुसार करणे.:**- मलकापूर ते धुपेश्वर ४०० मीमी व्यास PCCP RISING मेन असून शहरात ३ ते १५ इंची आकाराचे सिमेंट, लोखंडी, दि.आय.के पीव्हीसी पाईपची वितरण व्यवस्त असून विवध आकाराचे स्लूस व्हॉल्व असून ते नेहमी प्राप्त तक्रारीनुसार दुरुस्त करावे लागतात. तरी त्यासाठी वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे.

**D) विंधन विहिर व हातपंप साहित्य पुरवठा करणे व दुरुस्ती करणे:**- मलकापूर शहरात एकूण ८० हातपंप व विंधनविहिरी असून त्यांचा पर्यायी पाणी पुरवठा स्रोत म्हणून नागरिकांकडून नियमित वापर केला जात असतो. सदर हातपंप व विंधन विहीर दुरुस्ती बाबत नागरिकांकडून राक्रारी प्राप्त होत

असून वेळेवर दुरुस्ती न झाल्यास जनतेला पाणी समस्येस समोर जावे लागल्यास जनतेत रोष निर्माण होत असतो. तसेच न.प. कडे कर्मचारी संख्या नसल्याने सदर काम वार्षिक पद्धतीने करणे गरजेचे असून त्यासाठी वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे.

**E) पा.पु. विभागात लागणारे किरकोळ साहित्य खरेदी करणे:-** पा.पु. विभाग हा अत्यावश्यक सेवेत मोडत असल्यामुळे विविध प्रकारच्या तांत्रिक अडचणी येत असून बऱ्याचवेळी नवीन साहित्य खरेदी करावे लागते. तरी यापूर्वीचा अनुभव पाहता खालील प्रमाणे लागणारे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे.

१)शुद्ध पाणी उपसणारे पंपाचे फुटबॉल मोल्डिंग पद्धतीने तयार करणे.

२)धुपेश्वर व जलशुद्धीकरण केंद्र, नळगंगा जॅकवेल वरील पंपाकरिता लागणारे सक्शन पाईप फेब्रिकेट करून तयार करणे

३)ब्लोअर दुरुस्ती करणे

४)विविध साईझचे केसिंग पाईप खरेदी करणे

५)पाईप लाईन दुरुस्तीसाठी खोदलेला रस्ता पॅचिंग करणे.

६)व्हॉल्व साठी नवीन चेंबर बांधणे, दुरुस्ती करणे व कव्हर ढापे टाकणे

७) पा.पु. विभागातील पंपिंग स्टेशन धुपेश्वर, नळगंगा जॅकवेल व जलशुद्धीकरण केंद्र येथे आवश्यक त्या किरकोळ दुरुस्त्या करणे.

**F)पा.पु. विभागातील शासकीय देयके दंडनीय रक्कम वगळून १५ वा वित्त आयोग निधीमधून अदा करणे:-** पा.पु. विभागातुन पंपिंग स्टेशन धुपेश्वर, नळगंगा जॅकवेल व जलशुद्धीकरण केंद्र तसेच मौजे हतनूर येथील पाणी आरक्षण फी मौजे नळगंगा येथील पाणी आरक्षण फी, बारमाही भरावी लागते. सदर शासकीय देयकांचा भरणा १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत करणे गरजेचे आहे.

**G)धुपेश्वर पंपिंग स्टेशन जलशुद्धीकरण केंद्रावरील रोहित्र नादुरुस्त झाल्यास भाड्याने घेणे:-** धुपेश्वर पंपिंग स्टेशन जलशुद्धीकरण केंद्रावरील असलेले विद्युत रोहित्र एखादे वेळी महाराष्ट्र विद्युत वितरण विभागाकडून अतिरिक्त विद्युत दाब वाढविल्याने किंवा तांत्रिक बाबींमुळे नादुरुस्त झाल्यास किंवा जाळल्यास तसेच मलकापूर न.प. पा.पु विभागाकडे अतिरिक्त रोहित्र नसल्यामुळे पाणी पुरवठा पूर्णतः बंद ठेवावा लागतो व त्याचा परिणाम मलकापूर शहराच्या पाणी पुरवठ्यावर होतो. सदर परिस्थिती टाळण्यासाठी न.प. मालकीचे रोहित्र दुरुस्त होई पर्यंत भाडे तत्वावर घेऊन शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवता येईल.

**H)धुपेश्वर येथील कर्मचर्यांना प्रवास भाडे देणेबाबत:-** मलकापूर शहराच्या पा.पु.विभागाची हेडवर्क साईड मलकापूर शहरापासून १५ किमी अंतरावर असल्याने कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र परिवहन महामंडळाचे बसने वारंवार जावे यावे लागते. याकरिता लागणारे प्रवास भाडे हे सदर कर्मचाऱ्यांना मिळणेबाबत

**I) धुपेश्वर साईड वरील पंप दुरुस्तीसाठी पंप व पाईप उचलण्याकरिता ३ टन चेनब्लॉक व करिता लिफ्ट (ट्रॉली) खरेदी करणे**

वरील प्रमाणे A ते I कामे वारंवार करावी लागत असल्याने वार्षिक दरपत्रक मागविण्यास व सदर कामांचे देयक १५ वित्त आयोग / बंधनकारक अनुदान किंवा न.प. निधीतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.९ :- मलकापूर न.प. चे एम.जे.सी.क्र २१/२०२० न.प. मलकापूर विरुद्ध मे. खरे अँण्ड तारकुडे इन्फ्रा प्रा.लि. हे प्रकरण सक्षम न्यायालयाकडे वर्ग करण्या करिता वि. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब बुलढाणा यांच्या न्यायालयात पीटीशन दाखल करण्यास येणाऱ्या कोर्ट खर्चास, वकील फी व प्रवास भत्ता अदा करणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून मलकापूर न.प. चे एम.जे.सी.क्र २१/२०२० न्यायालयीन प्रकरण सक्षम न्यायालयाकडे वर्ग करण्यास जिल्हा न्यायाधीश साहेब बुलढाणा येथे पिटीशन दाखल करावयाचे असून सदर कामासाठी अॅड नितीन जाधव यांनी येणारा कोर्ट खर्च, वकील फी व प्रवास भत्ता मिळणे करिता एकूण रु २५०००/- चे बिल क्र ३७७६ दि ०९/१२/२०२२ रोजी सदर केले आहे. सदरचे प्रकरण न.प. मलकापूरच्या प्रशासकीय इमारतीच्या संदर्भात असल्याने पिटीशन दाखल करणे महत्वाचे आहे.

ठरविण्यात येते कि, उपरोक्त न.प. मलकापूरच्या न्यायालयीन प्रकरण संबंधी येणारा कोर्ट खर्च, वकील फी व प्रवास भत्ता अदा करण्यास हि सभा मान्यता देत आहे

**विषय क्र. १० :- मलकापूर नगर पालिकेच्या आरोग्य विभागाकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक निविदा करणे बाबत.**

आरोग्य विभाग अंतर्गत न.प. मलकापूर निधी अंतर्गत नियमितपणे करण्यात येणाऱ्या कामांसाठी तसेच आवश्यकता भासणाऱ्या साहित्यांसाठी वार्षिक निविदा करणे गरजेचे असून ती कामे खालील प्रमाणे.

१) शहरातील मच्छरांचा प्रादुर्भाव कमी करण्याकरिता फवारणीसाठी जंतुनाशक औषधी तसेच धूर फवारणी करिता फोगिंग लिक्विड, तन नाशक औषध, मलेरिया ओईल, फिनाईल व अॅसिड इत्यादी खरेदी करणे (अंदाजित खर्च १० लक्ष रु).

२) आरोग्य विभाग करिता सफाई कर्मचाऱ्यांसाठी व सफाई चे तसेच सार्वजनिक शौचालया करिता विवध साहित्य खरेदी करणे. (अंदाजित खर्च ३ लक्ष रु)

३) आरोग्य विभागातील सफाई कर्मचाऱ्यांकरिता गणवेश खरेदी करणे. (अंदाजित खर्च ७ लक्ष रु)

४) शहरातील मोकाट कुत्रे पकडून शस्त्रक्रिया करणे. (अंदाजित खर्च २० लक्ष रु)

५) न.प. मालकीचे ट्रॅक्टर ट्रॉली व इत्यादी गाड्यांची देखभाल दुरुस्ती करणे. (अंदाजित खर्च ३ लक्ष रु)

६) शहरात अवश्यक त्या ठिकाणी JCB मशीन, पोकलेन मशीन, डंपर व डम्पिंग ट्रॉली ट्रॅक्टर सह पुरविणे. (अंदाजित खर्च ५ लक्ष रु)

७) सन २०२३-२०२४ या वार्षिक कालावधी करिता न.प.ची रुग्णवाहिका चालविणे व तिची देखभाल करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. (अंदाजित खर्च - निरंक)

८) शहरातील नळगंगा नदीतील जलपर्णी वनस्पती काढणे. (अंदाजित खर्च ४ लक्ष रु)

९) श्री गणेश विसर्जनासाठी जलकुंभ ची व्यवस्था करणे. (अंदाजित खर्च ३ लक्ष रु)

१०) शहरातील मुत्री घरे सफाई करिता व इतर कामांकरिता टँकरद्वारे पाणी टाकणे. (अंदाजित खर्च ४ लक्ष रु)

उपरोक्त कामे प्र. आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवाला नुसार करणे आवश्यक असून त्या करिता वार्षिक दरपत्रक मागविण्यास व येणाऱ्या खर्चास हि सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.११ :- मलकापूर नगर पालिकेच्या आरोग्य विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांसाठी वार्षिक निविदा करणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून प्र आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सन २०२३-२०२४ या वर्षासाठी घरोघरचा व सार्वजनिक ठिकाणचा सर्व स्तरावरील घनकचरा संकलन करून न.प. च्या क्षेपणभूमी वर संकलित कचऱ्याचे दुय्यम वर्गीकरण करून त्यामधील ओला व सुका कचरा यांचेवर शस्त्री पद्धतीने व इतर पद्धतीने विविध प्रक्रिया करण्या करिता आवश्यक विविध मशीन्स व त्यासाठी लागणारे साहित्य तसेच या सर्व प्रक्रिया करण्या करीत्या व सार्वजनिक शौचालय साफ सफाई करिता मनुष्य बळ व साहित्या करिता सन २०२३-२४ या वर्ष कालावधीसाठी नवीन अंदाजपत्रके तयार करून निविदा प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे.

त्यानुसार वरील सर्व कामांसाठी सन २०२३-२४ करिता अंदाजपत्रकानुसार निविदा मागविण्यास व येणारा खर्च शासनाच्या १५ व्या वित्त आयोग निधीतून वा इतर योजनेतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.१२ :- सुनील जगन सारसर सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्ती व रिक्त जागेवर नवीन नियुक्ती करण्या बाबत.**

वरील विषयास अनुसरून आरोग्य लिपीक, कार्यालय परीवेक्षक व उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या अहवालावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते कि, श्री सुनील जगन सारसर हे आरोग्य विभागात दि ०२/०२/२००२ पासून सफाई कामगार म्हणून कार्यरत असून त्यांची २० वर्ष ५ महिन्यांची सेवा पूर्ण झालेली असून त्यांनी दि १४/११/२०२२ रोजी स्वेच्छा सेवा निवृत्ती मिळणे बाबत अर्ज सदर केला आहे. त्यानुसार मा. आयुक्त तथा संचालक न. प. प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र नपाप्रस/२००४ लाडकमिटी प्रक्र ११५/५-२६क - २४ नुसार सेवेत २० वर्षा पेक्षा जास्त सेवा झालेल्या सफाई कामगारांना स्वेच्छा सेवा निवृत्ती मंजूर करण्यास तसेच सदर रिक्त होणार्या सफाई कामगार पदावर अर्जदार श्री सुनील जगन सारसर यांचा मुलगा संदेश सुनील सारसर यांना लाडकमेटी शिफारशी नुसार वारस हक्काने नियुक्ती मिळणेबाबत आरोग्य लिपीक, कार्यालय परीवेक्षक व उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी अहवालात नमूद केले आसून त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता अर्जदार श्री सुनील जगन सारसर यांना मा. आयुक्त तथा संचालक न. प. प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र नपाप्रस/२००४ लाडकमिटी प्रक्र

११५/५-२६ का-२४ नुसार सेवेचे २० वर्ष पूर्ण केल्याने स्वेच्छा सेवा निवृत्ती देण्यास व सदर रिक्त होणार्या सफाई कामगार पदावर अर्जदार श्री सुनील जगन सारसर यांचा मुलगा संदेश सुनील सारसर यांना लाडकमेटी शिफारशी नुसार वारस हक्काने नियुक्ती साठी आवश्यक असलेले सर्व दस्त ऐवजांची पूर्तता केली असल्याने त्यांना नियुक्त करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.१३ :- स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत करावयाच्या कामांना मंजुरात देण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र.आरोग्य निरीक्षक नगरपरिषद मलकापूर यांनी सादर केलेला अहवालानुसार मलकापूर शहरांमध्ये स्वच्छता राखण्याच्या उद्दिष्टाने स्वच्छ सर्वेक्षण उपक्रम अंतर्गत विविध कामे करावयाची असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार शहरातील विविध प्रभागांमध्ये घनकचरा विलगीकरणा करिता घरोघरी जाऊन जनजागृती करणे व सर्वेक्षण करणे तसेच शहरातील प्रभागांमध्ये घरोघरी असलेले सेप्टिक टँक दर तीन वर्षातून एकदा रिकामे करून स्वच्छ करणे हे परिसरातील स्वच्छता टिकवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे त्याकरिता भिंतीवर स्टिकर लावून जनजागृती करणे व शहरातील विविध ठिकाणी प्रथमदर्शनी मोकळ्या भिंतीवर शहर सर्वेक्षण उपक्रमाकरिता स्वच्छता संबंधी जनजागृती चे पेंटिंग करणे हि कामे अत्यंत आवश्यक असल्याचे प्र.आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमूद केलेले आहे त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाबत सभेच्या निदर्शनास आणून दिली

वरील सर्व बाबींचा विचार करता वरील विषयात नमूद सर्व कामे स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत महत्त्वाची असल्या मुळे ती करण्यास व येणारा खर्च I.E.C. च्या फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.१४ :- स्वच्छ सर्वेक्षण २०२३ व माझी वसुंधरा ३.० अंतर्गत I.E.C ची कामे करण्या बाबत.**

वरील विषयास अनुसरून प्र.आरोग्य निरीक्षक न.प. मलकापूर यांनी सदर केलेल्या अहवालानुसार स्वच्छ सर्वेक्षण २०२३ व माझी वसुंधरा ३.० अंतर्गत शहर स्वच्छता जनजागृती करिता I.E.C. ची कामे करणे गरजेचे असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार करावयाची कामे खालील प्रमाणे

१)मलकापूर शहरात विविध ठिकाणी माहितीपट व जनजागृती करिता बॅनर लावणे.

२)शहरातील सार्वजनिक जागा, बगीचे येथे भिंतीचित्र व वृक्ष पेंटिंग स्पर्धा आयोजित करणे

३)स्वच्छता जनजागृती करिता निबंध, चित्रकला तसेच रांगोळी स्पर्धांचे आयोजन करणे

४)शासकीय व निमशासकीय संस्था, बँक मॉल्स, मोठ्या हॉटेल्स व रेस्टोरेंट इत्यादी आस्थापनांमध्ये क्लीन ऑफिस स्पर्धा आयोजित करणे.

५)मलकापूर शहरातील शासकीय व निमशासकीय संस्था तसेच व्यापारी, व्यावसयिक संघांमध्ये मागील वर्षी प्रमाणे विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणे.

वरील नमूद कामास अंदाजीत खर्च हा रु २ लक्ष इतका असून सदर कामांच्या आयोजनाच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.१५:- मलकापूर नगर पालिकेच्या भांडार विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक निविदा करणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून मलकापूर न.प. चे भांडार विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्ष कालावधीसाठी खालील नमूद कार्यालयीन कामाकरिता निविदा करावयाच्या आहेत.

१) कार्यालयीन साहित्य छपाई करणे. (अंदाजित खर्च ८ लक्ष रु)

२)कार्यालयीन कामाकरिता स्टेशनरी खरेदी करणे. (अंदाजित खर्च ७ लक्ष रु)

३)बॅनर प्रिंटींग फ्रेमसह लावणे व काढणे. (अंदाजित खर्च ३ लक्ष रु)

४)कार्यालयीन फर्निचर खरेदी करणे. (अंदाजित खर्च २ लक्ष रु)

५)फोटो व व्हीडीओ चित्रीकरण करणे. (अंदाजित खर्च २ लक्ष रु)

उपरोक्त कामे सहा. खरेदी पर्यवेक्षक यांनी सादर केलेल्या अहवाला नुसार करणे आवश्यक असून त्या करिता वार्षिक दरपत्रक मागविण्यास व येणारा खर्च न.प. निधी वा इतर निधीतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.१६ :- मलकापूर नगर पालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता अग्निशामक वाहनासाठी साहित्य खरेदी करिता वार्षिक निविदा करणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून प्र. अग्निशमन अधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवाला नुसार मलकापूर न.प. मालकीच्या दोन अग्निशामक वाहनांकरिता सन २०२३-२०२४ या वर्ष कालावधीसाठी खालील नमूद खालील साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे.

| Sr No | Name of Equipment | Quantity |
|---|---|---|
| 1 | Delivery hose pipe 63mm dia confirming to IS 636-1988 Type A in 15 m length with SS male and female couplings & binding. | 4 nos |
| 2 | 100mm PVC suction hose pipe in 2.5m length with 100mm suction gun metal couplings as per IS 3549-1983. | 3 nos |
| 3 | Suction strainer for 100mm suction hose - brass as per IS 907-1984 | 1 nos |
| 4 | Suction wrenches for 100mm suction hose couplings as per IS 4643-1984 | 2 nos |
| 5 | Basket strainer 100mm cylindrical type as IS 3582 | 1 nos |
| 6 | Branch pipe (IS 903-1975) | 2 nos |
| 7 | Breathing apparatus set (BA Set) as per IS standard | 1 nos |
| 8 | Petrol engine chain saw (wood cutter) as per IS standard | 1 nos |
| 9 | Petrol driven metal / concrete cutter with one spare wheel as per IS standard | 1 nos |
| 10 | Fire suit as per IS standard | 1 nos |
| 11 | AFFF foam compound can 20 ltr capacity | 4 nos |
| 12 | Foam branch - FB5X type with pick up tube as per IS 2097-1983 | 1 nos |
| 13 | Long line 40mm manila rope 30m long length (IS 1084) | 1 nos |
| 14 | Nylon rope ladder with snap hooks of 5 m length with aluminium round | 2 nos |
| 15 | Grapnel with nylon rope 16mm x 30m length | 2 nos |
| 16 | CO2 type fire extinguisher 4.5 Kg capacity IS : 15683 | 2 nos |
| 17 | ABC type fire extinguisher 6 Kg capacity IS : 15683 | 10 nos |

| | | |
|---|---|---|
| 18 | Fire extinguisher ball as per IS standard | 10 nos |
| 19 | Fire safety helmet ISI standard | 4 nos |
| 20 | Rubber gloves as per IS 4770-1991 for 5000 volts ISI standard | 4 Pairs |
| 21 | Gum boots high quality and standard size | 4 Pairs |
| 22 | Fireman Uniform | 4 nos |
| 23 | Safety shoes | 4 Pairs |
| 24 | Safety goggles | 4 nos |
| 25 | Face / Nose mask as per IS standard | 4 nos |
| 26 | Fireman raincoat standard size ISI standard | 2 nos |
| 27 | Aluminium double folding stretcher | 1 nos |
| 28 | Life boy ring | 6 nos |
| 29 | Life jacket | 6 nos |
| 30 | Bolt cutter 24" Tapariya make ISI standard | 1 nos |
| 31 | spade with wooden handle | 1 nos |
| 32 | Sledge hammer (IS:841) | 1 nos |
| 33 | Fireman pick axe (IS:273) | 2 nos |
| 34 | Crow bar (IS:704) | 1 nos |
| 35 | Tool kit (fixed spanners set, ring spanner set, screw drivers set, tester, oil feeder, small hammer, piler, adjustable spanner, tape, tool box etc) as per IS standard | 1 nos |
| 36 | Hand torch | 2 nos |
| 37 | First aid box for 5 persons as per IS standard | 2 nos |
| 38 | High pressure gun for fire vehicle | 2 nos |
| 39 | High pressure hose reel pipe for fire vehicle | 2 nos |
| 40 | Axe large as per IS standard | 1 nos |

ठरविण्यात येते कि, अग्निशामक वाहन हे अत्यावश्यक सेवेत येत असून त्यसाठी उपरोक्त साहित्य आवश्यक असून त्या करिता दरपत्रक मागविण्यास व येणारा खर्च  न.प. निधी वा इतर निधीतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.१७ :- मलकापूर नगर पालिकेच्या संगणक विभागाकरिता सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता नमूद केलेल्या कामांसाठी वार्षिक दरपत्रक मागविण्या बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून संगणक अभियंता संगणक विभाग नगरपरिषद मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये मलकापूर न.प. मधील विविध विभागांमध्ये असलेले संगणक प्रिंटर तसेच इंटरनेट व त्या संबंधित इतर यंत्रणा यांचा दैनंदिन कामकाजात सततचा वापर असून त्या सुस्थितीत ठेवण्याकरिता व त्यांचा नियमित वापर होण्याकरिता त्यांना वेळोवेळी देखभालीची दुरुस्तीची व गरजेनुसार नवीन साहित्याचा पुरवठा करण्याची गरज असते. तसेच अनेकदा शहरांमध्ये विविध सण उत्सव जयंती किंवा इतर विशिष्ट कार्यक्रमा संबंधी तहसील कार्यालय, पोलीस प्रशासन किंवा इतर वरिष्ठ विभाग वा कार्यालय यांच्याकडून शहरातील संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्याबाबत आदेश प्राप्त होत असतात त्याकरिता कार्यालयीन कामकाज व इतर कायदा सुव्यवस्था यांच्याशी निगडित बाबीं करिता सेवा पुरवणे गरजेचे असल्याचे नमूद केलेले आहे

त्यानुसार वरील सर्व कामांसाठी सन २०२३-२०२४ करिता अंदाजपत्रकांनुसार निविदा मागवण्यास व येणारा खर्च नगरपालिका निधी व इतर शासकीय योजना निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.१८ :- मिर्झा मुशीर अहेमद बेग मिर्झा जमीर बेग (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती देणेबाबत.**

मिर्झा मुशीर अहेमद बेग मिर्झा जमीर बेग (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती देणेबाबत प्र. प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग न.प. मलकापूर यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मिर्झा मुशीर अहेमद बेग मिर्झा जमीर बेग (शिक्षण सेवक) यांना न.प. प्राथमिक शिक्षण विभाग अंतर्गत उर्दू माध्यम शाळेत नियमित शिक्षकाची नियुक्ती देणे असल्याचे प्र. प्रशासन अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेला आहे. त्यानुसार न.प. प्राथमिक शिक्षण उर्दू माध्यम शाळेत पवित्र प्रणाली मार्फत मिर्झा मुशीर अहेमद बेग मिर्झा जमीर बेग यांना शिक्षण सेवक म्हणून निवड होऊन मा. शिक्षण संचालक (प्राथ.) महाराष्ट्र राज्य पुणे-१ पत्र क्र पवित्र/पदभरती/कागदपत्र पडताळणी/३०६/२९६८ दि२७/०८/२०१९ चे मार्गदर्शक सूचनानुसार कागदपत्र पडताळणी करून कार्यालयीन पत्र क्र नपम/शिवि/मुअ/१२१/२०२० दि ०९/०१/२०२० ला सदर उमेदवारास नियुक्ती देण्यात आलेली असून त्यांचे नियुक्तीपासून दि ०९/०१/२०२३ ला सलग सेवेचे तीन वर्ष पूर्ण झालेले आहेत. त्यानुसार शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र एसएसएन१०९९(३४०/९९)/माशी-२ दि. १३/१०/२००० नुसार शिक्षण सेवकाला सेवेत सामावून घेणेबाबत जोडपत्र अ सहपत्रातील अ.क्र. ८ नुसार शिक्षण सेवक या पदावर ३ शैक्षणिक वर्ष अर्थात ३० महिने समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराची शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणी नियुक्ती करण्यात यावी तसेच परिच्छेद १२ ला अधीन राहून नियुक्ती करण्यात यावी असे नमूद केलेले आहे. तसेच न.प. उर्दू उच्च प्राथ. कन्या शाळा यांचे अहवालानुसार सदर कर्मचाऱ्याचे ३ वर्षाचे शैक्षणिक कार्य समाधानकारक असून तीनही वर्षाच्या वर्गाचा निकाल १००% आहे व तीन वर्षाचे कार्यमुल्यांकन अहवाल चांगले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता मिर्झा मुशीर अहेमद बेग मिर्झा जमीर बेग (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग यांचे मान्यतेस अधीन राहून देण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.१९:- प्र. उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर श्री सुनील एस पगारे यांच्या वैद्यकीय खर्च प्रतीपुर्तीचे बिला बाबत.**

वरील विषयास अनुसरून न.प. मलकापूरचे प्र. उपमुख्याधिकारी श्री सुनील पगारे यांनी त्यांचे वडिलांना लागलेल्या वैद्यकीय खर्चाचे मागणी केली असून त्या संबंधित बिल त्यांनी मा. आयुक्त तथा संचालक न.प. प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील दि ३१ ऑक्टोबर २०२२ रोजीचे सुधारित परिपत्रक क्र नपप्रस-२०२२/कक्ष-३/ संवर्गपरिपत्रक सुधारित आदेश प्र क्र ७६/२०२२/४७८७ नुसार वैद्यकीय खर्च प्रतीपुर्तीचे बिल मिळणेबाबत अर्ज केला असून सदर बिल हे मा जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडे तपासून पुढील कार्यवाही करण्यास हि सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.२०:- सन २०२३-२४ करिता दैनिक बाजार आठवडी बाजार बैठक वसुली व जाहिरात कर वसुली कंत्राट पद्धतीने देणेबाबत**

उपरोक्त विषयास अनुसरून सहाय्यक मिळकत व्यवस्थापक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर नगर परिषदेचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये दैनिक बाजार व आठवडी बाजार तसेच जाहिरात कर वसुलीच्या कंत्राटा करिता नियमानुसार सन २०२२-२३ चे निश्चित केलेल्या दरामध्ये दहा टक्के वाढ करून सन २०२३-२४ करिता किंमत निश्चित करण्याचे नमूद केलेले आहे.त्यनुसार

| अ.क्र. | कंत्राटाचे नाव | सन २०२२-२०२३ कंत्राट किंमत | सन २०२३-२०२४ कंत्राट किंमत(१०% वाढ करून) |
|---|---|---|---|
| १ | दै बाजार बैठक वसुली | १३,३६,७२३/- | १४,७०,३९५/- |
| २ | आठवडी बाजार बैठक वसुली | १०,०८,१७८/- | ११,०८,९९५/- |
| ३ | जाहिरात कर वसुली | १,६१,७५९/- | १,७७,९३४/- |

तसेच सन २०२२-२३ मध्ये दैनिक व आठवडे बाजार बैठक वसुलीचा कंत्राट देण्यासंबंधी तीन वेळा जाहीर निविदा प्रसिद्ध करून सुद्धा एकही निविदा प्राप्त झाली नाही परिणामी वसुलीचा कंत्राट न गेल्यामुळे सदर बैठक फी वसुली नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या मार्फत आजपर्यंत सुरू आहे त्यामुळे नवीन निविदा प्रक्रिया करण्याकरिता वरील प्रमाणे किंमत निश्चिती करावी लागेल त्याचप्रमाणे मागील वर्षाचे कंत्राटदार यांना जाहिरात कर कंत्राट सर्व अटी व शर्तींना अधीन राहून तसेच सदर विषयाकरिता झालेले ठराव (स्थायीसमिती ठराव क्र ९ दि ०९/०२/२०२१, सर्वसाधारण ठराव क्र २३ दि २९/०७/२०२० व प्रशासकीय ठराव क्र १ दि ११/०५/२०२२) नुसार मागील वर्षातील जाहिरात कर कंत्राट रकमेत दहा टक्के वाढ करून देण्यासंबंधी नमूद केले आहे.

तसेच दै व आठवडी बाजार बैठक व वसुलीच्या कंत्राटाची सरकारी किमत निश्चिती करिता मागील३ वर्षाचे सरासरी उत्पन्न ते खालील प्रमाणे

| सन | दै बाजार बैठक फी वसुली | आठवडी बाजार बैठक फी वसुली |
|---|---|---|
| २०२०-२०२१ | ३,७६,६८०/- | ९५,५८०/- |
| २०२१-२०२२ | ६,५८,२२०/- | कोविड मुळे बंदी |
| २०२२-२०२३ (३१ जानेवारी पर्यंत) | ४,२५,९६०/- | १,६७,२००/- |
| २०२३-२४ (सरासरी) | ५,३५,६४८/- | २,६२,७८०/- (२०२०-२३एकूण रक्कम) |

तसेच दै व आठवडी बाजार वसुलीचा कंत्राट कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावमुळे कोणी घेतला नसल्यामुळे सदर कंत्राटाच्या किमती मोठ्याप्रमाणात वाढ झालेली असल्याने ज्या मागील वर्षी सदर कंत्राट दिला त्यावार्षाची सरकारी किंमत निश्चित केल्यास सदर कंत्राट घेण्यास ठेकेदार घेऊ शकतात त्यामुळे त्या मागील वर्ष्याच्या कंत्राट रक्कम खालील प्रमाणे

दै बाजार बैठक वसुली कंत्राट सन २०१९-२० मध्ये ९,३९,२१२/- रु मध्ये गेलेला होता तदनंतर जाहिरात मोठ्या प्रमाणात काढून सुद्धा कोणीही कंत्राट घेतला नाही तसेच आठवडी बाजार वसुलीचा कंत्राट सन २०१७-१८ मध्ये सरकारी किंमत रु ११,०५५,७७/- इतका होता परंतु मागील ३ वर्षाची

सरासरी काढून ती रक्कम ६२,४६,९५/- इतकी निश्चित केली गेली व त्यानंतर सदर कंत्राट हा लिलाव करून सुद्धा गेलेला नाही. त्यामुळे आजपर्यंत सदर वसुली न.प. कार्माचार्यान्मार्फात करण्यात येत आहे.

त्यामुळे वरील ३ पर्यायांपैकी जाहिरात कर वसुली सन - २०२२-२३ कंत्राट किंमत १,६१,७५९/- मध्ये १०% वाढ करून येणारी रक्कम १,७७,९३४/- इतकी होत असून मागील वर्षाचे कंत्राटदार यांना मुदत वाढीने देण्यात येत आहे. तसेच सन २०२३-२४ करिता दै बाजार बैठक वसुली कंत्राटाची सरासरी किंमत ५,३५,६४८/- असून त्यामध्ये ४०% वाढ करून येणारी रक्कम ७,४९,९०७/- इतकी निश्चित करण्यात येत आहे. तसेच आठवडी बाजार बैठक वसुलीचे कंत्राट रक्कम अल्प स्वरुपात असल्यामुळे सन २०२०- ते २०२२ पर्यंतच्या एकूण रक्कम २,६२,७८०/- इतकी होत असून त्यामध्ये ५०% वाढ करून येणारी रक्कम ३,९४,१७०/- इतकी निश्चित करण्यात येत आहे. तसेच सदर कंत्राटाच्या निविदा बंद पाकीटामध्ये बोलावून करण्यास अथवा ई-लिलाव पद्धतीने करण्यास व येणाऱ्या खर्च न.प. फंडातून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.२१:- सन २०२१-२२ मध्ये १५ वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रीयेचे कामास २०२२-२३ करिता दि. ०१/१२/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यंत १५ वित्त आयोग निधी अंतर्गत/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प. निधीतून कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून दिलेल्या मुदत वाढीस मान्यता देणे बाबत.**

घनकचरा प्रक्रियेचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीच्या प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांना सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास निधी उपलब्ध नसल्याने मंजुरात मिळालेली नाही. करिता १५ वित्त आयोगातील निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याकारणाने तसेच सदर काम सुरू ठेवणे स्वच्छ भारत अभियानाच्या व कचरा मुक्त शहराच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्यामुळे न.प.च्या सक्षम प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजुरीस अधिन राहुन नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत सदर कामास १५ वित्त आयोग निधी अंतर्गत/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प.निधीतून मुदतवाढ देणे आवश्यक होते, त्यानुसार माहे डिसेंबर २०२२ व जानेवारी २०२३ या महिन्यांकरिता वरील प्रमाणे कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच अद्यापही १५ वित्त आयोग निधी अंतर्गत निधी प्राप्त न झाल्यामुळे व फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्यात निधी प्राप्त झाल्यासही निविदा प्रक्रिया होऊन कार्यारंभ आदेश करणे हे शक्य होणार नाही. तरी दि. ०१/०२/२०२३ ते ३१/०३/२०२३ या दोन महिन्यांसाठी वरील प्रमाणे कार्योत्तर मंजुरीस अधिन राहून मुदतवाढ देण्यात आली आहे. करिता सदर एकूण चार महिने मुदत वाढीच्या कालावधीत या कामाचा खर्च १५ वित्त आयोगाच्या निधीमधून/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प.निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना दिलेल्या विविध आदेशान्वये दि. ०१/१२/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यंत एकूण चार महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी सदर मुदत वाढीस कार्योत्तर मान्यता देण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च १५ वित्त आयोग निधी/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प. निधीतून करण्यासही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.२२ :- सन २०२१-२२ मध्ये १४ वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकीचे कामास २०२२-२३ करिता दि. ०१/१२/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यंत १५ वित्त आयोग निधी अंतर्गत/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प. निधीतून सन २०२१-२२ चे कंत्राटदारास कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून दिलेल्या मुदत वाढीस मान्यता देणे बाबत.**

घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीच्या प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांना सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास निधी उपलब्ध नसल्यामुळे मंजुरात मिळालेली नाही करिता १५ वित्त आयोगातील निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्या कारणाने तसेच सदर काम सुरू ठेवणे, शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नगर परिषदेच्या सक्षम प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत सदर कामास १५ वित्त आयोग निधी अंतर्गत/अन्यप्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प. निधीतून मुदतवाढ देणे आवश्यक होते, त्यानुसार माहे डिसेंबर २०२२ व जानेवारी २०२३ या महिन्यांपर्यंत वरील प्रमाणे कार्योत्तर मंजुरीस अधिन राहून मुदतवाढ देण्यात आली होती तसेच अद्यापही १५ वित्त आयोग अंतर्गत निधी प्राप्त न झाल्यामुळे व फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्यात निधी प्राप्त झाल्यासही निविदा प्रक्रिया होऊन कार्यारंभ आदेश करणे हे शक्य होणार नाही तरी दिनांक ०१/०२/२०२३ ते ३१/०३/२०२३ या दोन महिन्यांसाठी वरील प्रमाणे कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून मुदतवाढ देण्यात आली आहे करिता सदर एकूण चार महिने मुदत वाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च १५ वित्त आयोगाच्या निधीमधून/अन्यप्राप्त होणाऱ्या निधीतून अनुदानातून/न.प. निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाचे मान्यता घ्यावी लागेल त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस, गंगापूर यांना दिलेल्या विविध आदेशान्वये दिनांक ०१/१२/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यंत एकूण चार महिने मुदतवाढ देण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च १५ वित्त आयोग निधीतून/अन्य प्राप्त होणाऱ्या अनुदानातून/न.प. निधीतून काढण्यास ही सभा मान्यता देत आहे.

आर यु सुरडकर
प्रशासक
नगरपरिषद मलकापूर